**Impact Factor – 6.261** **ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

## International E-Research Journal

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**March -2019 Special Issue – 164**

## Mahatma Gandhi's Thoughts & Its Present Relevance

**Guest Editor:**
Dr. C. J. Khillare
Principal
Rayat Shikshan Sanstha's
Rajarshi Chhatrapati Shahu College,
Kolhapur, Dist. Kolhapur.

**Executive Editor of the issue:**
Mr. S. M. Mahajan
Dr. Mrs. M. B. Desai
Mrs. M. K. Kannade
Dr. Mrs. B. S. Puntambekar
Dr. M. M. Bandhare
Mr. S.A. Jadhav
Mr. V.K. Akhade
Miss. Dr. S. R. Kulkarni
Miss. A. V. Jadhav
Mr. B. B. Ghurke

**Chief Editor:**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

**Published by –**

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | महात्मा गांधीचे सत्य व अहिंसा संबधीचे विचार | प्रा. ममता कन्नाडे | 133 |
| 31 | महात्मा गांधी याचे आर्थिक विचार | श्री. दत्तात्रय वाघमारे | 137 |
| 32 | महात्मा गांधीजीची संगीत विषयक भूमिका | डॉ. माधुरी खोत | 143 |
| 33 | महात्मा गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली स्वातंत्र्य चळवळीत महिलांचे योगदान | डॉ.प्रकाश पाटील | 147 |
| 34 | महात्मा गांधीच्या आंदोलनातील स्त्रियांचा सहभाग | डॉ. एस.एस.संघराज | 151 |
| 35 | सातारा जिल्ह्याचा असहकार आंदोलनातील सहभाग | प्रा. एस.जी.निकम | 154 |
| 36 | महात्मा गांधीजिच्या आर्थिक विचाराची प्रासंगिकता | प्रा.जी.एस.बनसोडे, प्रा.ए.बी.मुळीक | 158 |
| 37 | गांधीवाद आणि मराठी कादंबरी व कविता | डॉ.संगीता खुरद | 161 |
| 38 | वर्तमान युगात महात्मा गांधीच्या नैतिक विचारांचे महत्त्व | कु. स्वाती भोगळे | 169 |
| 39 | महात्मा गांधीचे आर्थिक विचार व समकालीन उपयुक्तता | प्रा.मधुरा देसाई | 172 |
| 40 | महात्मा गांधी आणि स्त्रीविचार | डॉ. पद्माकर सर्जीराव | 176 |
| 41 | महात्मा गांधी : सत्य व अहिंसेचे महामेरू | मीनाक्षी मिनचे | 179 |
| 42 | महात्मा गांधींचे सत्य व अहिंसात्मक विचार व आजची तरुणाई | डॉ. तेजश्री रायते | 185 |
| 43 | गांधी विचारांची मूलतत्त्वे : सत्य आणि अहिंसा | श्री.विलास देऊलकर | 186 |
| 44 | महात्मा गांधीजींचा स्त्री विषयक दृष्टीकोन आणि आजची स्थिती | श्रीमती.संध्या माने | 192 |
| 45 | महात्मा गांधीजींचे धार्मिक विचार काळाची गरज | डॉ.नंदिनी रणखांबे | 196 |
| 46 | महात्मा गांधी यांच्या विचारातील अहिंसा तत्त्वाची मूल्यात्मकता | डॉ.सुनीता कांबळे | 200 |
| 47 | महात्मा गांधी : सामाजिक विचार | श्री.प्रदिप होडावडेकर | 205 |
| 48 | गांधीजींचे पंचायत राज संबंधी विचार | प्रा.आर्या जाधव | 210 |
| 49 | महात्मा गांधीजींचे अर्थशास्त्रीय विचार | डॉ.शर्वरी कुलकर्णी | 213 |
| 50 | गांधी विचारांच्या पाईक कस्तुरबा | डॉ.सुप्रिया खोले | 217 |
| 51 | महात्मा गांधीजींची स्त्री व हरिजन चळवळीतील भूमिका | महेश लोहार | 220 |
| 52 | महात्मा गांधीचे अहिंसा तत्त्वज्ञान : एक ऐतिहासिक अभ्यास | प्रा. विनोद सोनवणे | 226 |
| 53 | महात्मा गांधीजींच्या पर्यावरण व निसर्गविषयक विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता | श्री. बी. बी. घुरके, श्री. पी. एस. चौगुले व डॉ. एम. डी. कदम | 231 |
| 54 | म. गांधींच्या नेतृत्त्वाखालील स्वातंत्र्य लढ्यातील प्रभावी अस्त्र – 'चरखा' | हर्षदा कांबळे | 234 |
| 55 | महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचे सद्यकालीन औचित्य | सोमनाथ हुबाले | 238 |
| 56 | महात्मा गांधीजींच्या पर्यावरणावादी विचारांचे सद्यकालीन औचित्य | नागेश महाडीक | 243 |
| 57 | महात्मा गांधीजींचा स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांची भूमिका | कु.वनिता कुंभार | 247 |
| 58 | महात्मा गांधीच्या संकल्पनेतील ग्रामस्वराज्य एक अभ्यास | डॉ.व्ही.व्ही.पाडळकर | 250 |
| 59 | महात्मा गांधीजींचा स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांची भूमिका | श्री.दत्तात्रेय भोये | 257 |
| 60 | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार व त्यांची सद्यस्थितीतील उपयुक्ताता | अस्लम अत्तार | 263 |
| 61 | महात्मा गांधीच्या स्वराज्यविषयक विचारांचे विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा.ईश्वर वाघ | 268 |
| 62 | 'सर्वोदय' : पर्यायी विकासाचा आकृतिबंध | संदीप तुंडूरवार | 273 |
| 63 | मनोजय व विकारांचा संयम : महात्मा गांधी | प्रा. वाय. ए. आवळे | 278 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.* ***- Chief & Executive Editor***

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 164 - Mahatma Gandhi's Thoughts & Its Present Relevance
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

# 'सर्वोदय' पर्यायी विकासाचा आकृतीबंध

संदीप तुंडूरवार
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

## विषय प्रवेश

१६ व्या शतकात युरोपात झालेल्या औद्यागीक क्रांतीने पांरपारिक अर्थरचनेचे प्रारूप बदलविले आणि नव्या आकृतीबंधाची मांडणी केली. उदयोग आधारित विशेषत: मोठया, व्यापक आणि केंद्रीत व्यवस्थेचा उदय झाला. यामधून प्राचीन वा पंरपरागत अश्या सामंती आणि मजूर या वर्गवारीत परिवर्तन येउन भांडवलदार व श्रमीक अशी नवी रचना उदयास आली. या रचनेने पूढे जाउन भांडवलशाही संकल्पनेचा आकार धारण केला. याचा परिणाम मात्र नव्या साम्राज्यवादी व्यवस्थेत झाला.उत्पादनाला लागणारा कच्चा माल कमी दरात, मुबलक प्रमाणात विनासायास मिळावा याकरीता नवीन राज्ये अथवा भूभाग शोधून वसाहती उभ्या करण्याचा सपाटा औदयोगीकदृष्टया प्रगत युरोपीयन देशांनी सुरू केला. सुरूवातीला आपल्याच देशातील बांधवाच्या श्रमांचे शोषण करून नफेखोरी आणि उदयोग साम्राज्य उभे केलेत, तर वसाहतीच्या प्राप्तीनंतर स्वकीय व गुलाम या आधारावर हे संबंध प्रस्थापित होउन भांडवली व्यवस्था काम करू लागल्यात. उदयोगक्रांतीने धर्मयुद्धाच्या प्रसाराची जागा अर्थयुद्धाच्या परिघात आणली त्यामुळे मागील संदर्भ पुसले जाउन नव्या अर्थवादी संदर्भाची मांडणी होउ लागली. यामध्ये मात्र मालक–मजूर–उपभोक्ता या श्रेणीची उपज झाली. यामधील मालकानंतरच्या दोन श्रेणींचा विचार केवळ लूट करणे, प्रचंड नफा कमविणे आणि त्यामधून साम्राज्य प्रस्थापित करण्यात झाले. "व्यापाराच्या निमीत्याने भारतात आलेली 'लंडन कंपनी' व नंतरच्या 'इंग्लीश ईस्ट इंडीया कंपनी' यांचे एकत्रीकरण होउन १७०२ मध्ये 'युनायटेड कंपनी ऑफ मर्चंटस ऑफ इंग्लड ट्रेडींग दु द ईस्ट इंडीज' असे नामाभिधान प्राप्त झाले व तिचे प्रभुत्व १८५७ पर्यंत कायम राहिलेत."[१] कंपनीच्या आर्थिक शोषणाचे धोरण १८५७ चा उठावास कारणीभूत ठरले. ब्रिटीशांचा भारतातील प्रवेश उदयोग व्यवसाय उभारणी पर्यायाने मालक–श्रमीक या पृष्ठभूमीवर तपासावा लागतो.'मध्ययुगाच्या उत्तरार्धात युरोपात राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात परिवर्तन होउ लागलीत. प्रबोधन, भौगोलिक शोध, विज्ञान तंत्रज्ञानाचा शोध या घटनानी आधुनिक जगाची नांदी सुरू झाली. यामधून तयार झालेल्या तत्वप्रणालीला 'वाणिज्यवाद' म्हटल्या जाउ लागले व त्यातूनच भांडवलवाद उदयास आला.'[२]

उदयोग रचनेच्या उभारणीला विरोध वा प्रतिक्रीया म्हणून युरोपात समाजवादाने मूळ धरले. कार्ल मार्क्सने भांडवली व्यवस्थेचे विश्लेषण करून त्यातील पिळवणुकीचे तत्व ज्या प्रखरतेने मांडले त्याचा निचरा करणारा म्हणुन समाजवादाचा उदय दिसतो. समाजवादी तत्वज्ञानाने एककल्ली, एककेंद्री आणि अतिरेकी हव्यासांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टिने एक नवा विचार प्रस्तुत केला. विसावे शतक समाजवादाने प्रभावित झाले आणि व्यवस्थेच्या संचालनाला नवा अर्थवादी पर्याय मिळाला. समाजवाद भांडवलवादाची प्रतिक्रीया होती. राज्यव्यवस्थेच्या संचालनाचा नेमका आकृतीबंध कुठला असावा या संघर्षातून भांडवलवाद व समाजवाद स्विकारण्यात आला. दोन्ही विचारप्रक्रीया मात्र पाश्चात्य आहेत. गांधीनी दिलेला पर्याय जसा पूर्वेत्तर तत्वज्ञानाचा भाग आहे, त्याचप्रमाणे तो केवळ अर्थ व्यवस्थेचा सिद्धांत नसून यामाध्यमातून सर्वांचा सारखाच पंरतु सर्व प्रकारचा शाश्वत विकास घडवून आणण्याचा पर्याय होता. गांधीच्या या पर्यायाचा पूर्णत: स्विकार कुठल्याच

राज्यव्यवस्थेने न केल्याने त्याची युक्तता–उपयुक्तता, परिणाम, दिशा यांची मात्र चिकित्सा होउ शकली नाही. परंतु गांधी तत्वज्ञानातील या विचारात विश्वशांतीचे तत्व दडलेले आहे. त्यामुळे सर्वोदयाचा विचार भांडवलवाद व समाजवाद यांच्या तौलनिक संदर्भात होणे आवश्यक आहे.

**सर्वोदय सिद्धांत**

गांधीनी रस्कीनच्या 'अन टु धीस लास्ट' या इंग्रजी ग्रंथाचे गुजरातीत भाषांतर करतांना ग्रंथास 'सर्वोदय' हे नाव दिले. सत्य, अहिंसेच्या मार्गाने समता प्रस्थापित करून शोषणमुक्त समाजाची स्थापना व्हावी व शोषणमुक्त समाजात प्रत्येक व्यक्तीला विकासाची समान संधी उपलब्ध व्हावी अश्या समाजरचनेची उभारणी सर्वोदयात अतंर्भूत आहे. समाजातील शेवटच्या माणसाचा विकास पर्यायाने अंत्योदय घडून येणे म्हणजे सर्वोदय होय. यामध्ये कमी–अधिक अश्या मात्रांचा विचार नसून किमान महत्वाच्या मुलभूत गरजाची पूर्तता होणे याविषयीचा विचार पायाभूत आहे. गांधी म्हणतात 'सर्वोदयात सर्वांचा उदय म्हणजे विकास एकाच वेळी व्हावा आणि मानवी प्रगतीचा लाभ सर्वांना एकदमच मिळावा.' ही व्यवस्था जेव्हा शक्यतेचा पातळीवर उतरेल तेव्हा सर्वोदय निर्माण झालेला राहिल. गांधी भारताच्या परिस्थितीबाबत अवगत होते. विशेषःत दादाभाई नौरोजी व अन्य मंडळीनी मांडलेला विचार ते तपासत होते.'गत शताब्दी के मध्यकाल तक यह परिणाम हो गया था की भारतवर्ष केवल कृषीप्रधान देश रह गया था' एम. मार्टिन कृत प्दकपंद म्उचपतम मे 'अंग्रेज मनुष्य की औसत आय सालाना ३० रू याने (२ पौंड थी). दादाभाई उसे २० रूपये बताते थे. उस वक्त भारत के मजूर श्रमीक की आय केवल १८ शिलींग याने १३ रूपया. हर दीन के ३ पैसे से भी कम थी"[३]त्यावेळची स्थिती लक्षात घेतली तर सर्वोदयाचा विचार समजून येतो. गांधीनी आर्थिक प्राप्ती त्यातील होणारे श्रम या आधारावर मांडलेला सर्वोदयाचा विचार पटायला लागतो.

**भांडवलवादी सिद्धांत वा रचना**

कुमारप्पांनी भांउवलवादांचे तत्व सांगताना तिच्याआधाराची रचना विशद केली आहे-'It will suffice for our purpose to define capitalism as at economic arrangement . Where production and distribution of goods is carried a by individuals. who their stock of accumulated wealth for making more wealth for themselves. Two things for are therefore essential for capitalism-private capital are private profit'.[4] भांडवलशाही हे भांडवल अर्थव्यवस्थेचे नाव. या व्यवस्थेत भांडवलाची मालकी एका विशीष्ठ वर्गाकडे नसते त्या भांडवलाच्या आधारावर तो वर्ग उत्पादन साधनावर आपला मालकी हक्क प्रस्थापित करतो. कामगाराची क्रयशक्ती विकत घेतो.[५] भांडवल व्यवस्था व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तीचे कौशल्य, आधुनिकता, भौतिक रेलचेल आणि कल्पनेतील जगाला मूर्त स्वरूप देण्याची क्षमता राखणारी म्हणून ओळखली जाते. गेल्या पाच शतकात तिने आपले बस्तान भक्कमपणे रोवलेले आहे आणि तिचा प्रभाव जागतिक राजकारणांवर पडलेला आहे.

**समाजवादी सिंद्धात**

१९ व्या शतकातील कार्ल मार्क्सचे आर्थिक चिंतन म्हणजे समाजवाद होय. उदारवाद वा भांडवलवादातून पूढे अत्यंतिक व्यक्तीवादाला विरोध म्हणून जी प्रतिक्रिया उमटली ती समाजवाद म्हणुन पुढे परिचीत झाली."समाजातील सर्वच व्यक्तीचे हित जोपासने, त्यांच्या कल्याणाचा विचार करणे, समाज हितसंबंधाची उभारणी करणे थोडक्यात उत्पादनावरील नियंत्रण आणि वितरणावर समाजाची मालकी प्रस्थापित होणे याला समाजवाद म्हटल्या गेले."[६]पुढे समाजवादात अनेक उपसिद्धांताची भर पडली परंतु शास्त्रीय

ISSN : 2348-7143
March-2019

समाजवाद म्हणुन कार्ल मार्क्सचे स्थान अबाधित राहिले. श्रमीकांची पिळवणुक, मालकीहक्क, नफाखेरीतून येणारे साम्राज्य, व्यक्तीवादाच्या अविवेकी रचनामुळे समुहांचे होणारे अध:पतन यांकरीता समाजवादी विचार समोर आला. जवळपास एक शतकाहून अधिक काळ समाजवादांचा 'राज्यव्यवस्थेवर प्रभाव पडलेला दिसतो. समाजवादात आलेला हा विचार नंतर राज्यवस्थेत बळावल्या गेला. दुसऱ्या महायुद्धानंतर जग ज्या दोन भागात विभागल्या गेले होते त्यात भांडवलवाद अन् समाजवाद यांचा समावेश होता. प्राध्यान्यक्रम, वर्चस्व कुणाचे या आधारावर या दोन विचारांचे द्वंद दिसुन येते. अर्थरचनेचा नवा विचार तो एका शास्त्रोक्त कसोटयांच्या वर मार्क्सने मांडल्याने त्याला शास्त्रीय समाजवाद असे नाव पडले.

### तुलनात्मक विश्लेषण

भांडवलवाद व समाजवाद या सिद्धांताचा वापर झाल्याने त्यातील मुलतत्वे विश्लेषाच्या पातळीवर आलेत. तुलनेत सर्वोदय तत्वज्ञानाला प्रचलित भारतीय व्यवस्थेत जो अवकाश मिळाला तो मात्र मर्यादित राहिला त्याकडे ग्रामरचना, ग्रामस्वयंपूर्ण विशेषत: आदर्शवादाच्या दृष्टिकोणातून विचारात घेतल्या गेला. वस्तुत: सर्वोदय विचार मानवतावादी आणि विश्वव्यापकतावादी असून सर्वप्रकारच्या समस्यांचे निराकरण करण्याची त्यात शक्ती आहे. व्यवस्थेची विचारधारा म्हणुन भांडवलवाद व समाजवाद याकडे पाहिल्या जाते. एकविसाव्या शतकात समाजवाद गळून पडलेला आहे. व जगाच्या अर्थकारणाचा अवकाश भांडवलवादाने व्यापलेला दिसून येतो.

सर्वोदयात शेवटच्या माणसाचा विकास यावर भर आहे व आवश्यक मुलभूत गरजा पूर्ण होतील अश्या अर्थरचनेची मांडणी त्यामध्ये आहे. तुलनेने भांडवली व्यवस्थेत सर्वांच्या गरजा भागविण्याची हमी नाही केवळ कुशलता दाखविणाऱ्यांचा त्यात समावेश आहे. समाजवादात गरजा भागविल्या जातील असे म्हटल्या जाते. परंतु त्यात श्रमाचा वाटा समानच असावा यावर भर आहे.

सर्वोदयात मालकी व्यवस्था वा नियंत्रणाचा भाग एका विशिष्ठ व्यक्तींचा नसून सगळयाचा सहभाग पर्यायाने समान सामूहिक मालकीचा विचार त्यात असून सहकारीतेचे तत्व पाळल्या गेले आहे. भांडवलवादात मालकी हक्क भांडलवादाकडे आहे व तेच त्याचे नियंत्रक आहेत. समाजवादात मालकी समूहाची मानली जाते. "समाजवादाचे अंतिम ध्येय मानवकुल हे एकत्र कुंटूब बनले पाहिजेत जमीन, कारखाने वैगरे उत्पादक संपत्ती खाजगी मालकीची न ठेवता सामाजिक मालकीची बनवावी. ऐतखाउ मालकवर्ग आणि निर्धण मजूर वर्ग असा वर्गभेद नष्ट करून प्रत्येकाने आपल्या शक्तीप्रमाणे समाजाची सेवा करायला हवी."[७] त्यादृष्टिने यातील विचार सर्वोदयाच्या जवळ जाणारा आहे परंतु यामध्येही समूह मालकीचे तत्व राज्य या संकल्पनेतून आविष्कृत होत असल्याने प्रभावशाली व्यक्तीचे नियंत्रण यामध्ये निदर्शनात येते.

सर्वोदय गरजाच्या प्रमानात वस्तुची निर्मीती हे तत्व बाळगते आणि पर्यावरण, संसाधने यांचा विनाश होणार नाही याची काळजी घेते. भांडवलवादात बेसुमार उत्पादन, अतिरिक्त साठा, त्यातून प्रचंड नफा, स्पर्धा करतानांच पर्यावरण आणि संसाधने यांचा विचार करीत नाही. समाजवादातही सर्वोच्च गरजा सारख्याच प्रमाणात भागल्या पाहिजेत हा हेतू असल्याने भांडवलवादाप्रमाणेच तो विचार करताना दिसतो. फरक इतकाच भांडवलवादात कुवतीप्रमाणे उपभोग घेता येइल. तर समाजवादात सर्वांना सारखाच उपभोग यामधून कुवत, कुशलता वगळल्या गेली आहे.

सर्वोदयात मूल्य म्हणजे पैसा नव्हे तर नैतिक मूल्यांना महत्व दिले आहे. विश्व वा समाज यांची योग्य तऱ्हेने धारणा होण्याकरीता मूल्यांची गरज आहे. आध्यात्मिक असणारा हा विचार येथे महत्वाचा आहे."केन्स का

कहता था 'जिन पर मानव जाती का भौतिक कल्याण निर्भर है वह अर्थनिती होनी चाहीये' गांधी के अनुसार अर्थशास्त्र जीवन के दुसरे सामाजिक, राजनीतिक, धार्मिक पहुलओंसे संबधित है.आर्थिक विचार का मूलाधार नैतिकता है"[८] परंतु भांडवलवाद अन् समाजवादात मूल्यांचा विचार नाही त्यामुळे संघर्ष अटळ आहे. समतेतील खदखद आहे. व्यवस्थेतील सहभागाबाबत उदासिनता आहे. पर्यायाने विषमता, वंचितता, शोषण, हिंसा या उपद्रवी मूल्यांचा यामध्ये भर दिसून येतो. सोबतच भौतिकी स्वरूपातील बाजारपेठीय रचना दिसते.

सर्वोदयात मोठमोठी अवजड मशीने, प्रंचड प्रमाानातील उत्पादन, नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून श्रमाऐवजी यंत्राच्या माध्यमातून उत्पादन याला नकार आहे. यामध्ये समूचित तंत्रज्ञानाचा स्विकार आहे व प्रत्येकाच्या हाताला काम व कामाला दाम अशी सर्वस्पर्शी रचना आहे. यंत्रापेक्षा मानवी बळ व त्याच्या कुशलतेवर सर्वोदयाचा भर आहे. "श्रमनिष्ठा न केवल आर्थिक सामाजिक साम्य का मार्ग प्रशस्त करती है. बल्कि यह एक स्वावलंबी, सत्याग्रही जातीविहीन व वर्गनिहीन रचनात्मक समाज निर्माण करती है. मै हर एक अविष्कार का स्वागत करूंगा जिसके सबका भला हो."[९] तुलनेने भांडवलवादात फारसा वाव नाही. अलिकडे तर रोबोट मशिन तयार झाल्यामुळे मानवीश्रमाचा उपयोग कमी होत असून वाढल्या लोकसंख्येत हा प्रश्न चिघळल्या जातो आहे. समाजवादी अर्थव्यवस्थाही भांडवलवादी व्यवस्थेला याबाबतीत पुरक आहे. मोठे उदयोग, विशाल धरणे, अवजड मशीन व यंत्राचा वापर व त्यामधून सर्वांना लाभ असा विचार करतो परंतु सर्वांचा सहभाग राहिल याबाबत तो समाधान करीत नाही.

सर्वोदयात शेवटच्या माणसाचा विचार केला आहे. त्यासोबतच सर्वांना म्हणजेच स्त्री–पुरूष, कुशल–अकुशल, शारीरीक श्रमीक व बौद्धिक श्रम करणारे यांना आपआपल्या क्षमतेप्रमाणे स्थान आहे. हे स्थान श्रम, गरजापूर्ण करणे येथ पर्यंतच मर्यादित नाही तर राजकीय व्यवस्थेतील वाटा समान असून कमीत कमी शासन, प्रथमत: व अंतिमत: शासनाचा लोप आणि कर्तव्यधिष्ठित समाजव्यवस्थेची उभारणी अशी सर्वसमावेशक रचना आहे. तुलनेने भांडवलीव्यवस्थेत कुशल व्यक्ती, नवनवीन तंत्रज्ञानाचा आविष्कार करणारे, निसर्गावर, ब्रहमांडावर हुकूमत गाजविणारे यंत्रे, मशीने, तंत्रज्ञान तयार करणाऱ्यांला सन्मानपूर्वक स्थान आहे व इतरांच्या प्रती कृपापात्राची, दयेची भावना आहे. सोबतच एकेंद्रीयव्यवस्थेला बळकटी देणारा विचार असून इतरांचा समावेश केवळ मतदान पातळीवरच गणल्या गेलेला दिसून येतो. समाजवादी व्यवस्था यापेक्षा भिन्न नाही फरक केवळ राज्यव्यवस्थेमध्ये सामान्यांच्या वाटयाला स्थान दिलेले आहे. प्रत्यक्षात मात्र तिथेही मातब्बर व्यक्तीच्या हातीच सत्तेचे केंद्रीकरण झालेले दिसून येते.

समालोचन

तौलनिक दृष्टया विचारकरता अनेक पातळयावर सर्वोदय–भांडवलवाद–समाजवाद यांच्यात अतंर आहे. सर्वोदय सातत्याने सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, अस्वाद व त्याच्या बरोबरीने येणाऱ्या ब्रम्हचर्याचा विचार मांडून शक्य असलेल्या समाजाची कल्पना करतात.[१०] विनोबांनी भूदान, ग्रामदान, खादीवापर, समूचित तंत्रज्ञान, पर्यावरणपुरक तंत्रज्ञान यामधून सर्वोदयचा विचार प्रत्यक्षात येण्यास अवरोध नाही हे सिद्ध केले. गृहउदयोग, कुटिर उदयोग, ग्रामोदयोग, बांबुउदयोग, वनउदयोग हे त्याचे प्रस्थापित चित्र मानता येते त्यामुळे सर्वोदय विचार कप्पेबंद वा पुस्तकबंद चौकटीत आहे असे म्हणता येत नाही. उलट सर्वोदयाचा विचार काळाची गरज ठरू शकते. तुलनेत समाजवाद आज वजा झालेला आहे. चीनचा राजकीय ढाचा समाजवादी असला तरी त्यांची आर्थिकरचना भांडवलवादी बनली आहे. त्यामुळेच देंग च्या काळानंतरचा चीन माओच्या तुलनेत बदलला. समाजवादी पूर्व जर्मनी लयाला गेला तर पूर्वीच्या सोव्हिएट रशियाचे १५ तुकडे होउन त्याचे स्थान युरोप पर्यंतच

ISSN : 2348-7143
March-2019

मर्यादित तर बनलेत पण १९९० ते २००५ पर्यंत रशियाला भांडवली अमेरिकेवर अवलंबून राहावे लागले त्यामुळे समाजवादाचा विचार राजकीय व्यवस्थेतून नाकारल्या जाउ लागला. भांडवली व्यवस्थेचे प्रतिनिधीत्व करणारी अमेरिका मात्र आपला आब राखून आहे. तिची एकछत्री व्यवस्था पाहता सामन्यांना दिपवून टाकणारी वाटते. त्यातून तिचे समर्थन केल्या जाते. भारतातही याचा प्रत्यय दैनंदिनीत येतो आहेच. विकासाच्या परिभाषेत सामान्यांना सर्वोदय बसत नसल्याचे वाटते त्यामुळे सर्वोदयी विचाराबाबत अनास्था दिसते. खर तर शाश्वत जगाचा विचार जर कुठला ठरणार असेल तर तो सर्वोदय आहे. सामान्य लोक क्षणिक आकर्षण, मनमोहून टाकणाऱ्या समृद्धिकरीता तिचा टिकाव धरून ठेवण्याकरीता तौलनिक दृष्टिने पाहता 'सर्वोदय' हाच महत्वाचा आणि चिरतंन विचार आहे.

## संदर्भ ग्रंथ


१. कंपनी सरकार (ईस्ट इंडीया कंपनी), अ.रा.कुलकर्णी, राजहंस प्रकाशन पुणे, प्र.आ. २०००,ISBN:81-7434-
२. १८०. पृष्ठ.क्रं.८
३. कित्ता, पृष्ठ.क्रं.९
४. मार्क्स और गांधी का साम्य दर्शन, नारायणसिंह, हिन्दी साहित्य सम्मेलन प्रयाग, शकाब्द १८८५, पृ.क्रं.४७
५. Capitalism, Socialism or Villageism? Bharatan Kumarpappa, Shakti karyalayam, Madras, 1946 Pg.no.1
६. सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांताचा शोध, राज्यशास्त्र, डॉ. वी.आर.जोशी, डांयमड पब्लिकेशन, पुणे, प्र.आ.२००७, ISBN ८१.८९७२४.७२.ɼ पृ.क्रं.२३
७. कित्ता, पृ.क्रं.२४४ व २४५
८. सत्याग्रही समाजवाद, संपा.सुहास पळशीकर, (आचार्य जावडेकर निवडक लेखसंग्रह), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९४, पृ.क्रं.५७—५८
९. म.गांधी व्यक्ती और विचार, विश्‍व प्रकाश गुप्त, राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली 2008,ISBN:81-7487-442- पृ.क्रं.१६८
१०. गांधीवादी समाजवाद, डॉ उपेन्द्र प्रसाद, नमन प्रकाशन, नई दिल्ली २००७,ISBN: ८१. ८७३६८.३९.१० पृ.क्रं.२८०
११. आधुनिक राजकीय विचारप्रणाली, डॉ. दिलीपसिंह निकुंभ, प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव, २०१५,
१२. ISBN: ९७८.९३.८४२२८.९९. पृ.क्रं.२३७